# महाराष्ट्र शासन

# भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक

## (PRE I.A.S. TRAINING CENTRE, NASHIK)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवार, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२ २२२.

## प्रवेश परीक्षा २०१८

**UPSC नागरी सेवा परीक्षा २०१९ (IAS/IFS/IPS etc.) च्या परीक्षापूर्व प्रशिक्षण-२०१८-१९**

**सूचना पत्रक**

**ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०१९ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे प्रवेशासाठी **प्रवेश परीक्षा रविवार, दिनांक ११.११.२०१८ रोजी फक्त नाशिक केंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तूत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. **प्रवेश क्षमता : एकुण ७० पैकी -**

| | | |
|---|---|---|
| (१) | भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक - | ६० |
| (२) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे BARTI व्दारा अनुदानीत | १० |

२. सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज या कार्यालयाच्या www.iasnashik.org.in या संकेतस्थळावर दिनांक ०१.०९.२०१८ ते ०३.१०.२०१८ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक व वेळेनंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

३. या कार्यालयाचे अधिकृत www.iasnashik.org.in संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज पूर्ण माहिती भरल्यानंतर फॉर्म अंतिमत: जमा करता येईल. फॉर्म जमा केल्यानंतर डेबिटकार्ड, क्रेडिटकार्ड अथवा नेटबँकिंगव्दारे ऑनलाईन परीक्षाशुल्क अदा करता येईल किंवा भारतीय स्टेट बँकेत परीक्षा शुल्क भरण्याबाबतचे चलन उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेले आवश्यक ते शूल्क भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावे. उमेदवाराने आवश्यक शूल्क भरल्याची खात्री करावी. **फॉर्म जमा केल्यानंतर परीक्षा शूल्क भरणे आवश्यक आहे, अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.**

४. सदर परिक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरता येईल. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. कोणत्याही उमेदवाराने इतर कोणत्याही प्रकारे या कार्यालयात अर्ज सादर केल्यास सदर अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

५. प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येऊ नयेत. प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील. (केवळ सही व फोटो स्कॅन करुन अपलोड करावेत) अपलोड करतांना फोटोची व सहीची साईज प्रत्येकी ३५ केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

६. उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करतांना कार्यान्वीत असलेला भ्रमनध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावा. जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाव्दारे नोंदविलेला भ्रमनध्वनी व ई-मेल आयडी हा अपूर्ण अथवा चुकीचा असल्यास, तसेच भ्रमनध्वनी (मोबाईल) क्रमांक NCPR Registered (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रवेश प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी सूचना देऊन प्रवेश परिक्षेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

७. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक परीक्षा शुल्क मुदतीत अदा केले आहे त्यांना प्रवेश परीक्षेचे (CET) प्रवेशपत्र (HALL TICKET) त्यांच्या लॉग इन आयडी व्दारे अधिकृत संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येईल. कोणत्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी आल्यास त्यांनी मोबाईल क्रमांक ०८२९६१७५२५८ या क्रमांकावर संपर्क साधावा. किंवा कार्यालयीन वेळेत कार्यालयीन क्रमांक ०२५३-२२३०१०० या क्रमांकावर संपर्क साधावा.

९. उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर अर्जावर नमूद केलेला अर्ज क्रमांक (Application No.) व अर्जामध्ये नमूद केलेला पासवर्ड जतन करुन ठेवावा.

१०. **प्रवेश अर्ज ऑनलाईनवर भरण्याचे वेळापत्रक-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | ०१.०९.२०१८ | ०३.१०.२०१८ |
| २ | भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहीत चलनाव्दारे प्रवेश परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | ०४.०९.२०१८ | ०६.१०.२०१८ |
| ३ | प्रवेशपरीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | २६.१०.२०१८ | ११.११.२०१८ |
| ४ | **प्रवेश परीक्षा /CET EXAM** | **११.११.२०१८ (रविवार)** | |

११. **परीक्षा शुल्काची आकारणी व शुल्क भरणा प्रक्रिया (ऑनलाईन पेमेंट किंवा चलनाव्दारे)-**
सदर प्रवेश प्रक्रियेत खालील प्रमाणे शुल्क आकारले जाणार असून सदर प्रवेश परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक प्रवेश परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| ०१ | खुला प्रवर्ग | ३००/- |
| ०२ | राखीव प्रवर्ग<br>इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज./अनुसूचित जाती/जमाती | १५०/- |
| ०३ | १) डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड अथवा नेटबँकिंगव्दारे ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.<br>**किंवा**<br>२) भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरतांना प्राप्त झालेल्या विहीत चलनाव्दारेच रोखीने भरता येईल. | |

१) ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर डेबिटकार्ड, क्रेडिटकार्ड अथवा नेटबँकिंगव्दारे ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

किंवा-

२) प्रवेश परीक्षा शुल्क हे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरतांना प्राप्त झालेल्या विहीत चलनाव्दारेच रोखीने भरता येईल.

३) प्रवेश परीक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहेत. याशिवाय संबंधित बँकेकडून जे प्रवेश प्रक्रिया शुल्क आकारले जाईल ते शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

१२. प्रवेश परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित असणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न असणाऱ्या उमेदवारांना प्रवेश परीक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवारांनी स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहनपरवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड इ. सोबत आणणे आवश्यक राहील.

१३. उमेदवारांनी उत्तरे लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईच्या (Black Ball Pen) बॉलपेनचा वापर करावा. अन्य कोणत्याही साधनाचा वापर केल्यास संबधीत उमेदवाराची उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४. **प्रवेश परीक्षा पध्दत-**

प्रवेश परीक्षा एकुण-२०० गुणांची असेल, UPSC नागरी सेवा (पूर्व) परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहिल.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकुण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| **Section-I** सामान्य अध्ययन | ५० | १०० | **English** | सकाळी ११.०० ते ०१.०० वाजेपर्यत एकुण-०२ तास | वस्तुनिष्ठ Objective type (MCQ) Negative marking one-third (0.33) of the marks assigned to that question |
| **Section-II (C-SAT)** सामान्य अध्ययन | ४० | १०० | **English** | | |
| सामान्य अध्ययन **Section-II (C-SAT)** हा Qualifying Section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे. | | | | | |

१५. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक प्रवेश परीक्षा ही नागरी सेवा पूर्व परीक्षा २०१८ (UPSC, CIVIL SERVICES PRELIMINARY EXAMINATION-2018) च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. प्रवेश परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची आहे. तसेच प्रत्येक चुकीच्या उत्तराला त्या प्रश्नाच्या मार्काच्या १/३ (०.३३) इतके मार्क कमी करण्यात येतील. परीक्षेची वेळ ११.०० ते ०१.०० वा. परीक्षा एकुण २ तास प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका इंग्रजी भाषेमध्ये असेल. अभ्यासक्रम खालीलप्रमाणे-

## SYLLABUS

### Section- I ( GENERAL STUDIES-100 Marks )

• Current events of National and International Importance
• History of India and Indian National Movement
• Indian and World Geography – Physical, Social, Economic Geography of India and the World.
• Indian Polity and Governance – Constitution, Political System, Panchayati Raj, Public Policy, Rights Issues, etc.
• Economic and Social Development – Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics, Social Sector Initiatives, etc.
• General issues on Environmental Ecology, Bio-diversity and Climate Change – that do not require subject specialization
• General Science.

**Section- II ( CSAT-100 Marks )**

• Comprehension
• Interpersonal skills including communication skills;
• Logical reasoning and analytical ability
• Decision-making and problem-solving
• General mental ability
• Basic numeracy (numbers and their relations, orders of magnitude, etc.) (Class X level), Data interpretation (charts, graphs, tables, data sufficiency etc. - Class X level )

**Note 1-** Section- II will be a qualifying paper with minimum qualifying marks fixed at 33%.
**Note 2-** The question paper will be of multiple choice, objective type.

इतर महत्त्वाच्या सूचना :

(१) परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती, सूचना www.iasnashik.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(२) भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक या संस्थेमध्ये पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षेकरिता प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

(३) संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमास सहभाग घेता येणार नाही.

(४) वैद्यकीय पदवीधारकाने आंतरवासिता (INTERNSHIP) पूर्ण करणे आवश्यक आहे.

(५) उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे. (Domicile Of Maharashtra Certificate) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. रा.प्र.व्य.१०१८(१७१/९८)/म.शि.-०१, दिनांक २४.०४.२००० नुसार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील निर्देशित गांव किंवा शहरातील संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे नमुद करणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील रहिवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थी पात्रता परीक्षा संस्थेतून झाल्याचे व त्यांची/तिची मातृभाषा मराठी भाषा असल्याचे तसे संस्थेच्या प्राचार्य यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच इयत्ता १० वी ची परीक्षा मराठी विषय घेवून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(६) प्रवेश परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोबाईल फोन, माहिती तंत्रज्ञान साधने व किंमती वस्तू जवळ बाळगू नयेत.

(७) अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येऊ नये. सर्व कागदपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील.

स्वाक्षरी/-
**(डॉ. विजय पां. नारखेडे)**
संचालक,
भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक.